FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT 0154158

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. 31/20, वर्ष Year 2020, दिनांक Date 30/12/2020

2. (i) अधिनियम Act प्र.प्र.अधि. 1988, कलमे Sections 7, 12

(ii) अधिनियम Act —, कलमे Sections —

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections —

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day मंगळवार, तारीख पासून Date from 29/12/20, वेळ Time 17:00, तारीख पर्यंत Date to 30/12/20, वेळ Time 22:55

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 29/12/20, वेळ Time ...

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 55/20, तारीख Date 30/12/20 वेळ Time 23:50

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral —

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. —, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. —

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name एस. के., ठिकाणाचे नंबर No. if any बोले, गल्ली Ward रोड, रस्त्याचे नाव Name of road लक्ष्मी

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place बिल्डींगसमोर, गाव Village, पोस्ट Post दादर, तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. —, राज्य State —

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station —, तालुका Taluka —, जिल्हा Dist. —, राज्य State —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name श्री बापु मोरे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name बाळु मोरे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 56 वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. —

(e) पारपत्र क्रमांक Passport No. —, दिल्याचा दिनांक Date of Issue —, दिल्याचे ठिकाण Place of Issue —, (f) व्यवसाय Occupation —

(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ..., जनजात Sub-Caste ...

(h) पत्ता Address प्लॉट, गल्ली / सर्व्हे नं. Ward नं. 279, घर / नाव नं. House/Name No. शिवाजी, फोन / मो. नं. Phone/Mo. No. बाग, पॅन नं. PAN No. गोवंडी, कार्ड नं. Card No. मुंबई

रस्त्याचे नाव Road —, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place —, गाव Village —, पोस्ट Post —, पो. स्टे. P Stn. —

तालुका Taluka —, जिल्हा Dist. —, राज्य State —, सध्याचा पत्ता Present Address वरिलप्रमाणे

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

1) नारायण लक्ष्मण यादव हि. 39 वर्ष धंदा- नोकरी, विशेष वसुली व विक्री अधिकारी, सांगली सहकारी बँक लिमीटेड, दादर, मुंबई.



2) किरण बाळासाहेब सुपेकर हि. 47 वर्ष धंदा- नोकरी विशेष वसुली व विक्री अधिकारी, सांगली सहकारी बँक लिमीटेड, दादर, मुंबई.

Scanned with CamScanner

—फिर्याद— दिनांक— ३०/१२/२०२०

श्री. बापु बाळु मोरे वय:— ५६ वर्षे, धंदा :—नाही. सध्याचा राहण्याचा पत्ता :—फ्लॅट नं. ७,८, वसंत विहार, शिवाजी चौक, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई मो. क्र. ९५९४०६९२४४. समक्ष हजर राहून फिर्याद देतो की,

......................

मी वरील प्रमाणे असून नमूद ठिकाणी माझी पत्नी व मुले यांच्या समवेत राहावयास आहे. माझा मी रहात असलेल्या परिसरात स्कुलबसचा व्यवसाय असुन त्यामधुन मिळणाऱ्या उत्पन्नावर माझी व माझे कुटुंबियाची उपजिवीका चालते.

मी खारघर येथे घर खरेदी करण्यासाठी सांगली सहकारी बॅक लिमीटेड, मुंबई, गोवंडी शाखा येथुन दिनांक १०/०२/२०१३ रोजी ५,००,०००/— रूपयाचे कर्ज घेतले होते. सुरूवातीला सदर कर्जाचा वेळेवर भरणा करित होतो. मार्च २०२० पासुन कोरोनाचे संसर्गामुळे लॉकडाउन होवून, माझा स्कुलबसचा व्यवसाय पुर्णपणे बंद झाला. त्यामुळे मी कर्जाचा हप्ता वेळेवर भरू शकलो नाही.

माझे कर्जाची परतफेड थांबल्यामुळे सांगली सहकारी बॅकेने माझे नांव थकबाकीदार यादीत समाविष्ठ केले. बॅकने नेमलेले वसुली अधिकारी श्री एन. एस. यादव यांनी माझे मोबाईलवर वारंवार फोन करून मला कर्ज भरण्यास तगादा लावला. व जर कर्जाचा हप्ता भरला नाही तर घरावर जप्ती कारवाई केली जाईल अशी धमकी दिली. व त्यानंतर त्यांच्या सहीनिशी दिनांक ०९/११/२०२० रोजी सांगली सहकारी बॅक लिमीटेड, दादर, मुंबई येथील मुख्य कार्यालयात सुनावणीसाठी समक्ष उपस्थित रहाण्याची नोटीस दिली.

मी विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री नारायण यादव यांनी दिलेल्या नोटीसप्रमाणे दिनांक ०९/११/२०२० रोजी सकाळी ११.०० वा. चे दरम्यान दि सांगली सहकारी बॅक लि. दादर, मुंबई येथील मुख्य कार्यालयात जावून प्रत्यक्ष भेट घेतली. भेटी दरम्यान विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री नारायण यादव व किरण सुपेकर यांनी मला थकीत कर्जाचे हप्ते लवकरात लवकर भरण्याबाबत सांगून, हप्ते न भरल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही केली जाईल असे सांगितले. मी आजपावेतो कर्जाच्या रक्कमेपैकी १,६६,०००/— रूपये कर्जाची रक्कम भरणा केली होती.

दिनांक २९/१२/२०२० रोजी मी सकाळी सांगली सहकारी बॅक, लि. चेंबुर मुंबई येथे पैसे भरण्याकरीता गेलो. त्यावेळी विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री नारायण यादव यांना फोन केला असता त्यांनी मला चेंबुर येथील येवले चहा येथे चहा पिण्याकरिता बोलाविले. भेटी दरम्यान श्री. नारायण यादव यांना मी आज ५०,०००/— रूपये भरणार असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री नारायण यादव यांनी मला त्यांचे महाराष्ट्र शासनाचे ओळखपत्र दाखवून ''बॅकेमध्ये पुर्ण ५०,०००/— रूपये न भरता बॅकेत फक्त ३०,०००/— रू भरा व मला २०,०००/— रू दया. मी बॅकेच्या अधिकारी यांना मॅनेज करून कर्जाचे व्याज कमी करून देतो असे सांगितले.

Scanned with CamScanner

**फिर्यादी श्री बापू बाळू मोरे यांचा दि. ३०/१२/२०२० रोजीचा जबाब**

विशेष वसुली व विक्री अधिकारी, यांना मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २९/१२/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे आलो. व वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. त्यांनी मला पोलीस निरीक्षक उमेश कोरडे व सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी माने यांची भेट घालून दिली व स्व:हस्ताक्षरात लेखी तक्रार अर्ज देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडे लाचेच्या मागणी करणारे दि सांगली सहकारी बॅक लिमीटेड, या बॅकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी, नारायण यादव यांचेविरूध्द स्व:हस्ताक्षरात लेखी तक्रार अर्ज दिला.

बॅकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी, नारायण यादव यांनी मला दिनांक ३०/१२/२०२० रोजी मोबाईलवरून संपर्क करून येण्यास सांगितले असल्याने, पोनि उमेश कोरडे व सपोआ शिवाजी माने यांनी मला माझे तक्रारीच्या पडताळणी करीता बॅकेचे वसुली अधिकारी नारायण यादव यांची त्यांचे कार्यालयात जावून प्रत्यक्ष भेट घेवून कर्जाच्या व मागीतलेल्या लाचेच्या रक्कमेच्या संदर्भात चर्चा करून मागणीची पडताळणी केली जाईल. व पडताळणी दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर प्रत्यक्ष होणारे संभाषण ध्वनिमुद्रित करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यास त्या अनुषंगाने पुढील सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले. व योग्य त्या सुचना दिल्या.

पोनि कोरडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दिनांक ३०/१२/२०२० रोजी सकाळी ०८.३० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई येथील कार्यालयात उपस्थित राहिलो. पोलीस निरीक्षक कोरडे व सपोआ शिवाजी माने यांनी मला पंच व सापळा पथकातील अंमलदार यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी, पोलीस अधिकारी व पंच असे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पहिल्या माळयावरील गोपनीय कक्षात गेलो. तेथे पंचासमक्ष पोनि कोरडे, पंच व माझे वक्तव्य डीजीटल व्हाईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर पोनि कोरडे व सपोआ शिवाजी माने यांच्या सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल फोनवरून विशेष वसुली अधिकारी श्री नारायण यादव यांना संपर्क केला. त्यावेळी विशेष वसुली अधिकारी श्री नारायण यादव यांनी मला सिध्दीविनायक मंदिर दादर येथे येवून फोन करण्यास सांगितले.

त्यानंतर मी, पोलीस अधिकारी व पंच पथकासह शासकीय वाहनाने प्रभादेवी सिध्दीविनायक मंदिर, दादर मुंबई येथील आरबीआय क्वार्टर्स, वि.दा.सावरकर मार्गावर आलो. तेथे पोनि कोरडे यांनी पुन्हा डीजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून मला मोबाईल फोनवरून विशेष वसुली अधिकारी नारायण यादव यांचे मोबाईलवर संपर्क साधण्यास सांगितले. पोनि कोरडे यांचे सुचनेप्रमाणे मी श्री नारायण यादव यांचे फोनवर संपर्क केला असता त्यांनी मला सिदधीविनायक मंदीर समोरिल एच. पी. पेट्रोल पंपाजवळ थांबण्यास सांगून त्यांचे सहकारी विशेष वसुली अधिकारी किरण सुपेकर हे येवून भेटतील असे सांगितले.

पोनि कोरडे यांनी लाचेच्या मागणी पडताळणी संदर्भात पुन्हा सुचना देवून डीजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझे शर्टाचे आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच क्र. २ श्री रविंद्र मेश्राम असे माझे मोटार सायकलने सिध्दीविनायक

समक्ष

(उमेश महेश कोरडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

मंदिरासमोरील एच. पी. पेट्रोल पंप येथे विशेष वसुली अधिकारी श्री नारायण यादव यांचे सांगणेप्रमाणे विशेष वसुली अधिकारी श्री किरण सुपेकर यांना भेटण्यासाठी आलो. तेथे माझी व विशेष वसुली अधिकारी श्री किरण सुपेकर यांची पंचासमक्ष भेट झाली. भेटीदरम्यान किरण सुपेकर यांनी माझेकडे श्री नारायण यादव यांनी केलेल्या लाचेच्या मागणीची रक्कम देण्यास सांगितले.तेव्हा मी माझा मुलगा पैसे घेवून येत असल्याचे त्यांना सांगितले. त्यानंतर माझे व किरण सुपेकर यांची चर्चा झाली. वसुली अधिकारी सुपेकर यांनी मुलगा पैसे घेवून आल्यानंतर पुन्हा फोन करा मी लगेच येतो असे सांगून ते निघून गेले. त्यानंतर मी व पंच क्र. २ मेश्राम असे कारवाई पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. पोनि कोरडे यांनी माझे बनियनला लावलेला डीजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. झालेले संभाषण ऐकूण लाचेची मागणी झाल्याची खात्री केली.

त्यानंतर पोनि कोरडे व सपोआ शिवाजी माने यांनी सापळा कारवाई करण्याबाबतचे सोपस्कर पुर्ण करून, सापळा कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या. पोनि कोरडे यांनी पुन्हा व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझे बनियनला लावला. व मी त्याचेकडे सादर केलेली लाचेची रक्कम त्यांनी मला अॅंथ्रासिन पावडर लावून पुन्हा दिली. व मला पंच क्रमांक ०२ मेश्राम यांचेसह लोकसेवक विशेष वसुली अधिकारी किरण सुपेकर यांची भेट घेण्याकरीता पाठविले. मी पंच क्र. २ मेश्राम यांचेसह माझे मोटार सायकलवरून पुन्हा सिध्दीविनायक मंदिर येथील एचपी पेट्रोल पंपासमोर आलो. त्यावेळी पोलीस अधिकारी, पंच क्र. १ व कारवाई पथक आजुबाजुस थांबुन राहिले. विशेष वसली अधिकारी सुपेकर यांनी सांगितलेप्रमाणे मी त्यांना पुन्हा माझे मोबाईलवरून संपर्क साधला असता त्यांनी सांगली सहकारी बॅंक, शाखा दादर येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी, पंच क्र. २ श्री मेश्राम यांचेसह मोटार सायकलवरून बॅंकेच्या दिशेने निघालो, तेव्हा कारवाई पथक माझे मागून बॅंकेच्या दिशेने पायी चालत आले. आम्ही एस.के.बोल्हे रोडवरील लक्ष्मी बिल्डींगच्या समोर आलो असता, तेथे श्री किरण सुपेकर यांची भेट झाली. भेटी दरम्यान श्री किरण सुपेकर यांनी माझेशी लाचेच्या रक्कमेच्या संदर्भात विचारणा करून ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम देण्यास सांगितले. त्यावेळी मी माझे शर्टाचे डाव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम काढून लोकसेवक किरण सुपेकर यांना दिली. लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर मी ठरल्याप्रमाणे लाच स्विकारलेबाबतचा इशारा सापळा पथकास केला. तेव्हा आजुबाजुस दबा धरून थांबलेल्या सापळा कारवाई पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी पंच क्र. १ यांचेसमक्ष विशेष वसुली अधिकारी श्री किरण सुपेकर यांना जागीच थांबवून, त्यांनी स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर पोनि कोरडे यांचे सुचनेप्रमाणे सुपेकर यांनी विशेष वसुली अधिकारी श्री नारायण यादव यांना मोबाईल फोनवरून संपर्क करून लाचेची रक्कम मिळाल्याचे सांगितले. त्यांस त्यांनी दुजोरा दिला. त्यानंतर मी व पंच पोलीस पथकासह दि सांगली सहकारी बॅंक लि. दादर येथील कार्यालयात पहिल्या माळयावरील लोकसेवक विशेष वसुली अधिकारी श्री नारायण यादव यांच्या कक्षात पोहोचलो. पोलीस पथकाने पंचासमक्ष लोकसेवक श्री नारायण यादव यांना स्वत:ची ओळख दाखवून पुढील कारवाईकरीता ताब्यात घेतले.

Scanned with CamScanner

**फिर्यादी श्री बापू बाळू मोरे यांचा दि. ३०/१२/२०२० रोजीचा जबाब**

तरी आज दिनांक ३०/१२/२०२० रोजी केलेल्या पडताळणी व सापळा कारवाईत सांगली सहकारी बॅकेचे वसुली अधिकारी नारायण यादव यांनी मी घेतलेल्या दि सांगली सहकारी बॅकेच्या कर्जावरील व्याज कमी करून देतो असे सांगून, माझेकडे रूपये २०,०००/— एवढया लाचेची मागणी केली व त्यांच्या सुचनेवरून बॅकेचे दुसरे वसुली अधिकारी किरण बाळासाहेब सुपेकर यांनी लाचेची रक्कम स्विकारली म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद असून कारवाई होणेस विनंती आहे.

दि सांगली सहकारी बॅकेचे वसुली अधिकारी नारायण सुर्यभान यादव व किरण बाळासाहेब सुपेकर यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत. तसेच नमुद लोकसेवकास देण्यासाठी आणलेली लाचेची रक्कम ही माझे वैयक्तीक बचतीतून आणलेली आहे.

माझी फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला वाचून समजावून सांगितली, ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(उमेश कोरडे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

बा।ळू

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

रु. 20,000/-

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ........ —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

खालील नमूद तारीख वेळी व ठिकाणी खालील फिर्यादी यांनी सांगली सहकारी बँक लिमीटेड मधील काढलेल्या कर्जाचा व्याजदर कमी करून देतो असे सांगून बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी आरोपी क्र.1 यांनी फिर्यादी यांचेकडे 20,000/- रु. च्या लाचेची मागणी केली व आरोपी क्र.2 याने लाचेची रक्कम स्विकारुन सहकार्य केले म्हणून कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक उमेश कोरडे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........ — ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ — ........, जिल्हा ........ — ........, राज्य ........ — ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ — ........ Rank........ — ........ No........ — ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ — ........ (3) Transferred to P. S. ........ — ........ District........ — ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ उमेश कोरडे

पदनाम Rank ........ पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ........

Posting ला.प्र.वि. वरळी, मुंबई.

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी नामे श्री बापु बाळु मोरे वय-56 वर्षे धंदा- नाही सध्या राहण्याचा पत्ता :- फ्लॅट नं. 7, 8, वसंत विहार, शिवाजी चौक, सेक्टर 12, खारघर, नवी मुंबई मो. क्र. 9594069244 यांचा स्वतंत्र कागदावर संगणकावर टंकलिखीत केलेला मराठीतील जबाब हिच या गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे

समक्ष

(स्वाक्षरी)

(उमेश कोरडे)
पोलीस निरीक्षक
गु.प्र.वि, मुंबई.

(स्वाक्षरी)

(२०) केस .-- (अ) लांब (ब) टक्कल (क) अर्ध टक्कल (ड) कुरळे काळे (इ) कुरळे काळे व करडे (फ) कुरळे करडे (ग) कृत्रिम केस/विग (ह) पांढरे (आ) व्यवस्थित कापलेले (ज) सरळ (झ) भुरे केस.
Hair .-- (a) Long (b) Bald gull (c) Bald Partial (d) Curly Black (e) Curly Black & Grey (f) Curly Gray (g) Wig (h) White (i) Hair Cut (j) Straight.

(२१) मान .-- Neck .-- (अ) लांब (ब) आखुड (a) Long (b) Short ..........

(२२) सवयी .-- (अ) विडी ओढणारा (ब) सिगारेट ओढणारा (क) तंबाखू खाणारा (ड) पान खाणारा (इ) सुपारी खाणारा (फ) ड्रग घेणारा (ग) दारू पिणारा (ह) वेश्याकडे जाणारा (आ) जुगारी (ग) लॉटरी खेळणारा (क) रेस खेळणारा (ल) तपकीर ओढणारा (म) सिनेमा शौकीन (न) इत्यादी ..........
**Habits** .– (a) Bidi Smoker (b) Cigarate Smoker (c) Chews Tobacco (d) Chews Pan (e) Chews Supari (f) Drug addict (g) Drinks Liquor (h) Prostitute Monger (i) Gambler (j) Lottery Player (k) Race goer (l) Snuff taker (m) Cinema Craxy (n) if any.

(२३) **कपड्यांच्या / पोषाख सवयी** .-- (अ) पॅंट शर्ट (ब) धोती कुर्ता (क) कोट पॅंट (ड) बन्डी धोती (इ) लुंगी कुर्ता (फ) शेरवानी (ग) फेटा धोती कुर्ता (ह) टोपी शर्ट पैजामा (आ) टोपी शर्ट धोती (ज) नेहरू शर्ट धोती (क) नेहरू शर्ट पैजामा (ल) सफारी (म) सहा वारी साडी (न) नऊ वार साडी (व) घागरा चोली (प) पंजाबी ड्रेस (क्यू) गुजराथी ड्रेस (र) फ्रॉक (स) बुरखा (ट) पॅन्ट टॉप (य) जीन्स व टॉप (व्ही) इत्यादी ..........
**Dress Habits** .– (a) Pant Shirt (b) Dhoti Kurta (c) Coat Pant (d) Bandi Dhoti (e) Lungi Kurta (f) Sherwani Payjama (g) Feta Dhoti (h) Cap Shirt Trouser (i) Cap Shirt Dhoti (j) Nehru Shirt Dhoti (k) Nehru Shirt Trouser (l) Safari (m) Sari 6 Meter (n) Sari 9 Meter (o) Ghagara Choli (p) Punjabi Dress (q) Gujrati Dress (r) Frock (s) Burqua (t) Pant top (u) Jeans and top (v) if any ..........

(२४) **भाषा** .-- (अ) मराठी (ब) हिन्दी (क) इंग्रजी (ड) तमिळ (इ) गुजराथी (फ) कर्नाटकी (ग) मारवाडी (ह) राजस्थानी (आ) उर्दू (ज) तेलगू (क) पंजाबी (ल) बंजारा (म) पारधी (न) नेपाळी (आ) काश्मिरी (प) कन्नडी (क्यू) आसामी (र) बंगाली (स) बिहारी (ट) मल्याळी (य) सिंधी (व्ही) खानदेशी / अहेरानी (लु) हरयानी (ए) इत्यादी ..........
**Language** .– (a) Marathi (b) Hindi (c) English (d) Tamili (e) Gujarathi (f) Karnataki (g) Marwadi (h) Rajasthani (i) Urdu (j) Telagu (k) Panjabi (l) Banjara (m) Pardhi (n) Nepali (o) Kashmiri (p) Kannadi (q) Asami (r) Bangali (s) Bihari (t) Maliyali (u) Sindhi (v) Khandeshi/Aherani (w) Haryani (x) if any ..........

(२५) शरीरावरील जळालेल्या खुणा / Burn Marks on which part of body and place ..........

(२६) शरीरावरील कोड / Leucoderma on which parts of body and place ..........

(२७) शरीरावरील तीळ / Mole on which parts of body and place ..........

(२८) व्रण / Scar on which parts of body and place ..........

(२९) गोंदन / Tattoo Marks on which parts of body and place ..........

(३०) शरीरावरील ओळख चिन्ह / Identification Marks ..........

(३१) **व्यंग / Deformities** .– (अ) जादा बोट (ब) कमी बोट (क) तुटका ओठ (ड) कुबडा (इ) लंगडा, कानाचे पाळे नसलेला, थोटा, एक पाय नसलेला, जुळा पंजा नसलेला (a) Additional Finger (b) Missing Finger (c) Broking lips (d) Hunchback (e) Lame lobeless Ear (f) One Arm missing (g) One Leg missing (h) Stooping (i) Toes extra (j) Toes missing.

(३२) विशेष वैशिष्ट्ये / Special feature/Peculiarities ..........

(३३) बोलणे / Speech/voice.-- जलद बोलणारा, बायकी बोलणारा, मोठ्याने बोलणारा, नाकात बोलणारा, सावकाश बोलणारा, मृदू बोलणारा, तोतरा बोलणारा Fast, Feminine, Loud, Spoken Nasal, Slow, Soft-Spoken, Stammering.

(३४) इतर वैशिष्ट्ये Other features if any ..........

वरील वर्णनाव्यतिरिक्त इतर माहिती असल्यास MORE INFORMATION IF ANY ..........

..........

14. तक्रारदाराची सही / व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant/Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer In-charge, Police Station.
संपूर्ण नाव Name उमेश कोरडे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र.
नेमणूक Posting ला.प्र.वि., मुंबई
तपासिक अं. चा कोड क्र.
Code No. of I. O. ..........

प्रत, तपासिक अंमलदार,
Copy to, Investigating Officer.

Scanned with CamScanner